# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

## अग्निशमन व आणीबाणी सेवा

**संदर्भ :- वाचा : महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९**

**अग्नि प्रतिबंधक ना-हरकत दाखला**

दाखला देण्यात येतो की श्री. प्रितेनकुमार पवनकुमार ढंढरीया स.नं.३३३/१+२+३, प्लॉ.नं.१२+१३ व २३+२४, फा.प्लॉ.नं.१२, वर्धमान नगर, संगमेश्वर वार्ड, मालेगाव जि.नाशिक (एकुण प्लॉट क्षेत्रफळ १८६८.०२ चौ.मी.[As per 7/12] पैकी वापरातील बांधीव क्षेत्रफळ १०३१.९९ चौ.मी.) या ठिकाणी शैक्षणिक या प्रयोजनासाठी मागितलेल्या परवानगीनुसार सार्वजनिक दृष्टिकोणातुन सदर ठिकाणी केलेल्या आग प्रतिबंधक व विमोचक उपाययोजनेची दि.३०/०३/२०२० रोजी तपासणी केली असता अस्तित्वात असलेली अग्निप्रतिबंधक उपाययोजना कार्यान्वित असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब उपरोक्त ठिकाणी **लिटील एंजल इंग्लिश मिडीयम स्कुल** या क्षेत्राकरिता खालील निम्नलिखीत अटी शर्तींवर अग्नि प्रतिबंधक ना-हरकत दाखला देण्यात येत आहे.

---

**- अटी व शर्ती –**

१) सदरचा दाखला हा मनपाने प्रमाणित केलेल्या नकाशा बरहुकूम बांधकामासाठी दिलेला आहे. मंजुर बांधकामाव्यतिरीक्त वाढीव बांधकाम व सामासिक अंतरातील बांधकाम, वापरात बदल केलेला असल्यास अशा अनधिकृत बदल झालेल्या इमारतीच्या भागास सदर दाखला लागु होणार नाही.

२) दाखला घेतलेनंतर सदर इमारतीच्या बांधकामात व वापरात बदल करण्यात आल्यास किंवा वाढीव बांधकाम केल्यास असा केलेला बदल मनपा नगररचना विभागामार्फत मंजुर करुन घ्यावा लागेल. तसेच केलेल्या बदलानुसार अग्निप्रतिबंधक व विमोचक उपाययोजनांमध्ये नियमानुसार फेरबदल करणे दाखलाधारकावर बंधनकारक राहील.

३) तळघर (बेसमेंट) चा वापर मनपा विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय वापरांसाठीच करता येईल. अन्य वापरासाठी सदरचा दाखला लागु होणार नाही.

४) सदरच्या ठिकाणी इतर शीघ्र ज्वालाग्राही पदार्थ / द्रव्याचा साठा करण्यात येऊ नये.

५) सदर जागेतील विद्युत वायरींग शक्यतो ISI मटेरिअल मध्ये केलेली असावी. विद्युत वायरिंगची उघडे जोड ठेवु नये. तसेच वापरात असलेली विद्युत साधने व उपकरणे स्पार्कप्रुफ असावीत.

६) सदर जागेत पोटमाळे नसावे. तसेच यापुर्वी मनपाच्या मंजुरीने पोटमाळा केलेला असल्यास त्याचा मानवी व इतर कामांसाठी गैरवापर करु नये.

७) रस्त्यात / जिना / पॅसेज / गेट या मार्गात कोणतेही अडथळे असु नये व हे मार्ग नेहमी मोकळे ठेवावेत.

८) सदरच्या ठिकाणी असलेली अग्निप्रतिबंधक व विमोचक उपाययोजना / साधन सामग्री आगीच्या वेळी कशी वापरावी याची माहिती परवानाधारक व तेथे काम करणारे कर्मचारी यांना असणे आवश्यक आहे.

९) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ३ नुसार खालीलप्रमाणे अग्निविमोचक व अग्निप्रतिबंधक उपाययोजना करणे बंधनकारक आहे.

- **९.१ पाण्याचा साठा (२५,००० लिटर)**
- **९.२ होज रील होज**
- **९.३ मॅन्युअली ऑपरेटेड इलेक्ट्रीक फायर अलार्म सिस्टम**
- **९.४ डाऊन कमर यंत्रणा**
- **९.५ इलेक्ट्रीक पंप १ नग (९०० एल.पी.एम.)**
- **९.६ मार्ग दिशादर्शक फलक**
- **९.७ धुम्रपान निषेध फलक**
- **९.८ अग्निरोधके (फायर एक्स्टिंगविशर)**
  - अ) Stored Pressure ABC Type Fire Extinguisher 6 Kg – 6 Nos.
  - ब) Sand Bucket – 4 Nos.

१०) ज्या जागेसाठी अग्निप्रतिबंधक ना-हरकत दाखला दिलेला आहे त्या ठिकाणी असलेली अग्निप्रतिबंधक व अग्निविमोचक उपाययोजना उपकरणे, बाहेर पडण्याचे मार्ग, पाण्याचा साठा, आपत्कालीन मार्ग इ. नेहमी सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये मालक / भोगवटादार / दाखला धारकाची असुन त्याबाबत खात्री करुन घेणेकामी वर्षातुन किमान १ किंवा २ वेळा अचानक भेटी देवुन तपासणीचे अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेला आहे.

११) अग्निशमन विभागाने सुचीत केल्यानुसार योग्य ती अग्निप्रतिबंधक उपाययोजना केलेली नसल्यास अथवा केले उपाययोजना वापरण्यास योग्य (सुस्थितीत) ठेवलेली नाही असे निदर्शनास आल्यास अग्निशमन विभागाने दिले मुदतीत सदर उपाययोजना सुस्थितीत आणणे दाखला धारकावर बंधनकारक राहील. तसे न केल्यास दा धारकाकडुन नियमानुसार दंड वसुल करण्यात येईल किंवा महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययो अधिनियम २००६ मधील कलम ८,३६,३८ नुसार कारवाई करण्यात येईल.

१२)महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ३(३) नुसार अग्निप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना दुरुस्त व कार्यक्षम असलेबाबत विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र नमुना 'ब' माहे जानेवारी व माहे जुलै महिन्यात म.शासनाने नियुक्त केलेल्या लायसन्स अभिकरणामार्फत सादर करणे दाखला धारकावर बंधनकारक राहील.

सदर दाखला संबंधित ठिकाणी केलेल्या अग्नि-प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना Active Fire Protection करिता दिलेला असुन Passive Fire Protection साठी लागू राहणार नाही. तसेच त्या अग्नि-प्रतिबंधक उपाययोजना कार्यक्षम ठेवण्याची जबावदारी संबंधित मालक / भोगवटाधारक / अभिकरण यांची असेल. त्यास अग्निशमन विभाग जबाबदार राहणार नाही. वरील अटी-शर्तींचा भंग झाल्याचे निर्दशनास आल्यास सदरचा दाखला कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करणेत येईल.

सदरचा दाखला १ वर्ष कालावधीकरिता ग्राह्य राहील.

ठिकाण :- मालेगाव

दिनांक :- ३०/०३/२०२०

बुक नं.७०५, पावती नं.७०४१४

रक्कम : ९,३६०/-

रक्कम : २०,६४०/- दि.२५/०६/२०१९ (नगररचना विभागाने कमी वसुल केलेली फी)

(पवार एस.डी.)
प्रमुख अग्निशमन अधिकारी
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

## वार्षिक निरीक्षण व तपासणी नोंदी

| अ. क्र. | वर्ष | वार्षिक निरीक्षण व तपासणी फी (किमान फी च्या १%) | फी भरल्याचा तपशिल बुक नं., पावती नं. व दिनांक | प्राधिकृत अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|
| १) | दि:30/3/2021 ते दि:29/3/2022 & दि:30/3/2022 ते दि:29/3/2023 | 500+500 =1000/- | "बी फॉर्मची नोंद घेतली" ६९ ६८०३ दि:11/8/2022 | (पवार संजय दादाजी) प्रमुख अग्निशमन अधिकारी मालेगाव महानगरपालिका, मालेगाव |
| २) | दि:30/3/2023 ते दि:29/3/2024 | 500/- | "बी फॉर्मची नोंद घेतली" 544 54401 दि:5/8/2023 | (पवार संजय दादाजी) प्रमुख अग्निशमन अधिकारी मालेगाव महानगरपालिका, मालेगाव |
| ३) | दि:30/3/24 ते दि:29/3/25 | 500/- | "बी फॉर्मची नोंद घेतली" 238 23758 दि:14/6/24 | (पवार संजय दादाजी) प्रमुख अग्निशमन अधिकारी मालेगाव महानगरपालिका, मालेगाव |
| ४) | दि:30/3/25 ते दि:29/3/26 | 500/- | 191 19063 दि:28/7/25 | (पवार संजय दादाजी) प्रमुख अग्निशमन अधिकारी मालेगाव महानगरपालिका, मालेगाव |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |